समारोप

रंगभूमी नियतकालिकातील, शेक्सपीअरच्या नाटकांवरील लेखांच्या अभ्यासातून, त्या लेखांचे जे विशेष जाणवतात ते असे :-

१. शेक्सपीअरच्या कलाकृतींचा अभ्यास हे एक अभ्यासाचे नवे दालन असल्याने श्री. गो. वा. बापट यांच्या सारख्या व्यासंगी विद्वानानेसुद्धा त्यात टप्प्याटप्प्यानेच प्रवेश केलेला दिसतो.

२. ‘ रंगभूमी ’ तील लेखांची, शेक्सपीअरच्या अभ्यासाबाबतची दृष्टी स्वतंत्र आहे.

३. या लेखांमध्ये, शेक्सपीअरच्या नाटकांची, पाश्चात्य समीक्षकांनी जी समीक्षा केली होती त्याचे उल्लेख आलेले आहेत. परंतु या लेखांपूर्वी मराठीत शेक्सपीअरचा विचार ज्यांनी ज्यांनी मांडला होता त्यांचा उल्लेख नाही. १९०८ ते १९१३ या काळात रंगभूमी नियतकालिकात हे लेख प्रसिद्ध झाले त्याच्या त्रेचाळीस वर्षे आधी मराठीत शोकान्तिकेची चर्चा झाली होती. पण ते सूत्र धरून, त्यातील विचार पुढे न्यावा असे वाटलेले दिसत नाही. तर नव्यानेच प्रारंभ करावासा वाटलेला आहे.

४. १८८३ नंतर, शेक्सपीअरचा मराठीत बंद पडलेला अभ्यास सुरू करण्याचे श्रेय ‘ रंगभूमी ’ तील या लेखांना द्यावेसे वाटते.

५. या अभ्यासामुळे मराठी नाट्यसमीक्षा अधिक व्यापक बनली.

संदर्भ टीपा

१. जगद्विख्यात नाटककार शेक्सपीअर व त्याची नाटके (रोमिओ अँड ज्युलिएट) - ले. गो. वा. बापट, रंग. व.४, अं.३, मार्च १९११, पृ.३१

२. टू जंटलमेन ऑफ व्हेरोना - ले. गो. वा. बापट, रंग. व.५, अं.१, मे १९१२, पृ.३३

३. ' नाट्य-शोध ' - शेक्सपीअरचे मराठी अवतार - डॉ. मु. श्री. कानडे.

४. वि. मो. महाजनी यांनी Cymbeline चे ' तारा ' या नावाने मराठीत रूपांतर केले होते. त्यातील नावे श्री. बापट यांनी या लेखात घेतली आहेत. ' तारा ' चा पहिला प्रयोग १८७७ मध्ये झाला व १८७९ मध्ये ते पुस्तकरुपाने प्रसिद्ध झाले.

५. ' तारा नाटक ' - शेक्सपीअरकृत ' सिंबेलाईन् ' च्या आधारे - विष्णु मोरेश्वर महाजनी, द्वितीयावृत्ती, १९८८. यामध्ये प्रथमावृत्तीची प्रस्तावना अंतर्भूत.